# कार्यवृत्त

आज दिनांक २२–६–२०१८ रोजी महाविद्यालय विकास विभागात सत्र २०१८–१९ पासून संलग्नीत महाविद्यालयातील आणि विद्यापीठ शैक्षणिक विभागातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश ऑनलाईन/केंद्रिय प्रवेश पध्दतीने सुरु झाले असून ही प्रवेश प्रक्रिया राबवितांना प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निरसन करण्याकरिता गठित तक्रार निवारण समितीची सभा पार पडली. सभेला खालीलप्रमाणे सदस्य होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १.डॉ विनायक श्री देशपांडे | अध्यक्ष | २. डॉ. राजश्री वैष्णव | सदस्य |
| २.डॉ. श्रीकांत कोमावार | सदस्य | ४. डॉ.जी.एस. खडेकर | सदस्य |

या सभेमध्ये विद्यापीठ ग्रामगीता भवन येथील सुविधा केंद्रात प्राप्त तक्रारी आणि प्रत्यक्ष आलेल्या विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निरसन करण्याकरिता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

१. ज्या विद्यार्थ्यांना नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली आहे त्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करण्यात यावी.
२. आज दि. २२–६–२०१८ रोजी सध्याकाळी ५–३० वाजेपर्यंत ज्या विद्यार्थ्यांची नोंदणी काही तांत्रिक अडचणीमुळे होवू शकली नाही अशा विद्यार्थ्यांच्या प्राप्त तक्रारींवर त्यांची नोंदणीची प्रक्रिया रितसर करण्यांत येईल.
३. ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे दस्तऐवजाची तपासणी होवू शकली नाही अशा विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या ग्रामगीता भवन येथे गुणवत्ता यादी तयार करण्यापूर्वी पूर्ण करण्यात यावी.
४. ज्या विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रियाच झाली नाही अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश केंद्रिय पध्दतीने वेगळा निर्देश काढून ऑफलाईन पध्दतीने पूर्ण करावी अशा विद्यार्थ्यासाठी विशेष अशा ४ थ्या फेरीचे आयोजन ग्रामगीता भवन येथेच करण्यात यावे. या फेरीतील प्रवेश उपलब्ध जागांनुसार देण्यात येतील. महाविद्यालयात जागाच उपलब्ध नसल्यास या फेरीच्या माध्यमाने प्रवेश देता येणार नाही.
५. ज्या विद्यार्थ्यांची नोंदणी झाली परंतु २२ जून २०१८ रोजी त्यांच्या दस्तऐवजाची तपासणी काही कारणाने होवू शकली नाही अशा विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया ४ थ्या फेरीत करता येईल.

१.डॉ. विनायक देशपांडे, अध्यक्ष, 22/6/2018 — २.डॉ. श्रीकांत कोमावार, (सदस्य) 22/06/18

३. डॉ. एच.डी. जुनेजा , (सदस्य) — ४.डॉ. राजश्री वैष्णव, (सदस्य) 22/6/18

५. डॉ. जी.एस. खडेकर (सदस्य) 22.6.18